मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# निवडणुका आल्या की अनेकांना कंठ फुटतो!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांना टोला

**पिंपरी | प्रतिनीधी**

'पिंपरी-चिंचवड महापालिकेत भाजपची सत्ता आल्यानंतर प्रचंड विकास कामे केली आहेत. या कामामुळेच विरोधकांचा वैताग, त्रागा, रागराग आहे. त्यांच्याकडे सांगायला काही काम नाही. त्यांना अनेक प्रश्न विचारले जातात. त्या प्रश्नांची उत्तरे नाहीत. त्यामुळे निवडणुकीची चर्चा विकासावरुन वादावादी, प्रश्न-उत्तरात झाली पाहिजे, असा त्यांचा प्रयत्न असे म्हणत निवडणुका आल्या की अनेकांना कंठ फुटतो', असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना नाव घेता लगावला.

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीतील भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री फडणवीस यांची शनिवारी आकुर्डीत जाहीर सभा झाली.



त्या वेळी ते बोलत होते. आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, उमा खापरे, अमित गोरखे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यावेळी उपस्थित होते. 'महाराष्ट्रातील वेगाने विकसित होणारे पिंपरी-चिंचवड शहर आहे. कष्टकऱ्यांची नगरी म्हणून शहर तयार झाले. भूमीपूत्रांसोबत महाराष्ट्राच्या विविध भागातून आलेले लोक कष्ट करत येथे वसले. त्यातून शहर तयार झाले' असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'शहर बदलले पाहिजे त्यासाठी २०१४ नंतर प्रयत्न केले. शहराला आधुनिक चेहरा देण्याचा प्रयत्न केला. निवडणुका आल्या की अनेकांना कंठ फुटतो. अनेक लोक काही-काही बोलत असतात. भाजपचे काम बोलत आहे. या कामामुळेच वैताग, त्रागा, रागराग आहे. हे समजून घ्यावे. ते रागवले म्हणून तुम्ही रागवू नका. शहरात आपण केलेली काम सांगितले तर, कोणालाही उत्तर देण्याची वेळ येणार नाही, असा सल्ला फडणवीस यांनी आमदार लांडगे यांना दिला.

'मागीलवेळीपक्षा यावेळी भाजपचे जास्त नगरसेवक निवडून येतील', असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला. तत्कालीन सरकारच्या काळात शहरात 'जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण योजने'तून (जेएनएनयूआरएम) १३ हजार सदनिका बांधण्याचे काम १५ वर्षे रखडले होते. १५ वर्षात केवळ सहा हजार ७०० सदनिका उभारल्या. बांधकाम अतिशय निकृष्ट झाले. भाजपची सत्ता आल्यानंतर पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत शहरात विविध ठिकाणी घरे बांधली. या दोन घरांच्या कामांची तुलना करावी. त्यातून तत्कालीन सत्ताधाऱ्यांचा कारभार काय होता आणि भाजपचा कसा होता, हे स्पष्ट होते', असेही फडणवीस म्हणाले.

### जागतिक दर्जाचे हब

» 'पुणे जिल्हा उत्पादन, तंत्रज्ञानाचे हब आहे. आता जागतिक दर्जाचे हब केले जाणार आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांची जागतिक स्तरावरची २५ टक्के कार्यालये पुण्यात सुरु केली जाणार आहेत. भविष्यात पुण्यापेक्षा पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या जास्त होणार आहे. त्यासाठी चांगले शहर विकसित करण्यासाठी प्रयत्न केले जात असल्याचे' फडणवीस यांनी सांगितले.

# अजितदादांनी पिंपरी-चिंचवडवर मुलासारखं प्रेम केलं; सुनेत्रा पवार

## निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विकास, टीका आणि कुटुंबीय एकतेवर खासदार सुनेत्रा पवार यांची भूमिका

**पिंपरी | प्रतिनिधी**

निवडणुकांचा जोर वाढत असताना राष्ट्रवादी काँग्रेस नेत्या खासदार सुनेत्रा पवार यांनी विविध मुद्द्यांवर आपली भूमिका स्पष्ट केली. सुरू असलेल्या बैठका आणि चर्चा या निवडणुकांच्या अनुषंगानेच होत असून, सर्वांशी संवाद साधण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

अजितदादा पवार यांच्या पिंपरी-चिंचवड शहराच्या प्रवासाबाबत बोलताना सुनेत्रा पवार म्हणाल्या की, "पिंपरी-चिंचवड शहराबाबत



अजितदादांची आत्मीयता मी खूप जवळून पाहिली आहे. स्वतःच्या मुलाप्रमाणे त्यांनी या शहरावर प्रेम केलं. शहराचा विकास कसा करता येईल याचा विचारच नाही, तर प्रत्यक्षात तो विकास करून दाखवला."

पिंपरीत आज अजित पवारांवर होत असलेल्या टीकांबाबत त्या म्हणाल्या, "मोठं व्हायचं म्हटलं की टीका होतच असतात. त्या सहन करण्याची सवय लागते. मात्र शेवटी आम्हीही माणूस आहोत, आम्हालाही भावना आहेत, त्यामुळे अशा टीकांमुळे वेदना होतात."

आमदार महेश लांडगे यांनी अजितदादांवर केलेल्या एकेरी आरोपांवर प्रतिक्रिया देताना त्यांनी स्पष्ट केले की, "आम्ही अजितदादांच्या नेतृत्वाखाली विकासाच्या मुद्द्यावर लढत आहोत. नवचैतन्य देण्याच्या दृष्टीने पुढे जात असून, टिकांकडे दुर्लक्ष करणार आहोत."

अजित पवार आणि सुप्रिया सुळे एकत्र दिसल्याच्या चर्चांवर बोलताना सुनेत्रा पवार म्हणाल्या, "आम्ही कुटुंब म्हणून नेहमीच एकत्र आहोत. हे आम्ही सर्वांनी बोलून दाखवलं आहे. त्यामुळे हे चांगलंच आहे."

निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सुनेत्रा पवार यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय चर्चांना पुन्हा वेग आला आहे.

# पिंपरी-चिंचवडमधील कारभारी बदला..

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पिंपरी-चिंचवडकरांना आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील कामांमध्ये भ्रष्टाचार, निविदेतील रिंग, रस्ते कामांतील गैरप्रकार, कुत्र्यांच्या नसबंदीतील घोटाळे, डांबरी रस्त्यावर सिमेंट कोणी टाकले. लाच प्रकरणात स्थायी समिती अध्यक्षाला अटक झाली. कोयता गँगने शहरात हैदोस घातला. अशा अनेक गोष्टी पिंपरी-चिंचवडमध्ये घडल्या आहेत. या सत्ताधाऱ्यांच्या राजवटीवर काहीही बोलणार नाही. पण, यात सुधारणा करण्यासाठी शहरातील कारभारी बदला असे आवाहन शिवसेना मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पिंपरी-चिंचवडकरांना केले.



पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीतील शिवसेना उमेदवारांच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री शिंदे यांची किवळेतील मुकाई चौकात सभा आयोजित केली होती. त्यांनी मोबाईल व्हिडिओ कॉलींगद्वारे नागरिकांशी संवाद साधला. उद्योगमंत्री उदय सामंत, उपनेते इरफान सय्यद, सुलभा उबाळे, महानगरप्रमुख राजेश वाबळे, जिल्हाप्रमुख राजेश खांडभोर, उपजिल्हाप्रमुख शरद हुलावळे, युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्र प्रमुख विश्वजीत बारणे, जिल्हा संघटक बाळासाहेब वाल्हेकर, शहरप्रमुख नीलेश तरस, जिल्हा संघटिका शिला भोंडवे, रुपेश कदम, सायली साळवे, माऊली जगताप यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने सभेला उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, महाराष्ट्राच्या प्रगतीला गतीमान करणारे पिंपरी-चिंचवड शहर आहे. शिवसेना विकासाचा अजेंडा घेऊन निवडणुकीला सामोरे जात आहे. शहरात बदल, परिवर्तन घडविण्याची, कारभारी बदलण्याची वेळ आली आहे. इतिहास टक्कर देणाऱ्यांचाच लिहिला जातो, तडजोड करणाऱ्यांचा नाही. त्यामुळे कोणालाही घाबरू नका आणि बिनधास्त लढावे. गेल्या तीन वर्षांपासून माझ्यावर सातत्याने टीका होत आहे. शिव्याशाप दिल्या जात आहेत. त्यामुळे तुम्हीही संयम ठेवा. हाल होतील, पण हार होणार नाही. सत्याला त्रास होतो, पण सत्य कधीही पराभूत होत नाही. शिवसेना स्वबळावर लढत असून तिला कोणीही हलक्यात घेऊ नये. शहराच्या विकासासाठी मोठा निधा दिला आहे. सांडपाणी निचऱ्यासाठी ५२ कोटींचा निधी दिला आहे. पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी १५३ कोटींची योजना मंजूर केली. पवना जलवाहिनी प्रकल्प राबविला जाणार आहे. नागरिकांना दररोज पाणीपुरवठा केला जाईल. पवना-मुळा-इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविणार आहे. समाविष्ट भागातील अर्धवट डीपी रस्ते पूर्ण केले जातील. चुकीचा डीपी दुरुस्त केला जाईल. वाकड-हिंजवडी वाहतूक कोंडी सोडविणार आहे. चापेकर स्मारकासाठी ६८ कोटींचा आराखडा मंजूर केला असून १३ कोटी वर्ग केले आहेत. अनधिकृत बांधकामाचा प्रश्न ऐरणीवर आहे. तोही सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील.

### शिवसेना किंगमेकरच्या भूमिकेत..

» सत्तेत आल्यानंतर शास्ती कर आणि त्यावरील दंड माफ केला. बाधित शेतकऱ्यांना साडेबारा टक्के परतावा दिला. ही हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना आहे. त्यांच्या विचारांशी तडजोड होणार नाही. एकदा शिवसेनेच्या हाती सत्ता देऊन दाखवा, विकासाचे कुलूप उघडून दाखवतो. मला काय मिळाले? यापेक्षा लोकांना काय दिले?, हे महत्त्वाचे आहे. आम्ही शब्द देऊन थांबत नाही, तर तो पाळतोही. सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलो नाही, पण तुमच्या आयुष्यात सोन्याचे दिवस आणण्यासाठी आमचा जन्म नक्कीच झाला आहे. शहरात भगवे वादळ आले असून शिवसेना किंगमेकरच्या भूमिकेत दिसले, असा विश्वासही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

### भय, भ्रष्टाचार, प्रदूषण मुक्त शहर करणार..

» खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, भय, भ्रष्टाचार, प्रदूषण मुक्त शहर करण्यावर भर राहील. एक पक्ष दुसऱ्यावर आणि दुसरा पक्ष त्या पक्षावर भ्रष्टाचाराचे आरोप करत आहे. या दोघांमध्ये भ्रष्टाचाराबाबत स्पर्धा लागली आहे. या स्पर्धेत शिवसेनेला उतरायचे नाही. शहरातील भ्रष्टाचार दूर करायचा आहे. त्यासाठी शिवसेनेचे नगरसेवक निवडून द्यावेत. गुंठेवारी कायद्यानुसार नियमित झालेल्या घरांच्या मालकांना प्रॉपर्टी कार्ड देऊन हक्काचे घर त्यांच्या नावावर केले जाणार आहे. शहरातील अनधिकृत बांधकामे नियमित व्हावेत यासाठी मी लढा दिला आहे. नगरविकास खाते एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. त्यांच्या माध्यमातून शहरातील सर्व प्रलंबित प्रश्न मार्गी लावले जातील.

# 'वॉकेथॉन फॉर मतदान'द्वारे दुर्गादेवी टेकडीच्या पायथ्याशी लोकशाहीचा जागर

## अभिनेत्री व मतदान जनजागृती ब्रँड ॲम्बेसिडर श्रेया बुगडे यांची उपस्थिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

अभिनेत्री श्रेया बुगडे यांच्या माध्यमातून करण्यात येणारी मतदान जनजागृती... 'मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो' अशा जोशपूर्ण घोषणांनी दुमदुमलेला परिसर... आणि लोकशाहीच्या जागृतीसाठी निघालेली शेकडो जणांची प्रभातफेरी...असे उत्साहपूर्ण वातावरण आज सकाळी निगडी येथील दुर्गादेवी टेकडीच्या पायथ्याशी निर्माण झाले होते.

लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी आणि प्रत्येक मतदाराला मतदानाच्या हक्काची जाणीव करून देण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने स्वीप उपक्रमांतर्गत विविध मतदान जनजागृती कार्यक्रम राबवले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आज दुर्गादेवी टेकडी परिसरात 'वॉकेथॉन फॉर मतदान' या जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास सुप्रसिद्ध अभिनेत्री तसेच पिंपरी चिंचवड महापालिका निवडणूक मतदान जनजागृतीच्या ब्रँड ॲम्बेसिडर श्रेया बुगडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर व उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली हा उपक्रम राबवण्यात आला,या जनजागृतीपर कार्यक्रमात जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह पर्यावरणप्रेमी नागरिक, युवक, महिला सहभागी झाले होते.

दुर्गादेवी टेकडी ,निगडी येथील मुख्य रस्त्यापासून ते पायथ्यापर्यंत अभिनेत्री श्रेया बुगडे यांच्या हस्ते मतदान जनजागृती करणाऱ्या पत्रकांचे प्रतिनिधिक स्वरूपात निसर्गप्रेमी तसेच नागरिकांना वाटप करून या मतदान जनजागृती प्रभातफेरी कार्यक्रमाची सुरुवात झाली.या फेरीदरम्यान 'मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो' आणि 'मतदान करा,मतदान करा -१५ जानेवारीला मतदान करा' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

मतदान जनजागृतीसाठी यावेळी सादर करण्यात आलेल्या फ्लॅश मॉबने उपस्थितांची विशेष मने जिंकली. तसेच प्रभावी संदेश देणारे पथनाट्य सादरीकरणही करण्यात आले. या सादरीकरणांमधून मतदानाचे महत्त्व, लोकशाहीतील नागरिकांची भूमिका आणि जबाबदारी ठळकपणे अधोरेखित करण्यात आली.

याप्रसंगी अभिनेत्री श्रेया बुगडे म्हणाल्या, 'पिंपरी चिंचवड महापालिका मतदान जनजागृतीसाठी सातत्याने वेगवेगळे उपक्रम राबवत आहे, हे कौतुकास्पद आहे. मतदान हा आपला हक्कच नाही तर कर्तव्य देखील आहे. आपल्या पुढील पिढीसाठी येत्या १५ जानेवारीला नक्की मतदान करा. युवकांनी या लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होऊन मतदान करून इतरांना देखील यासाठी प्रोत्साहित करावे. मतदानाचा दिवस हा सुट्टीचा दिवस न समजता मतदान करण्यासाठी प्रत्येक पात्र मतदाराने मतदान केंद्रावर जाऊन मतदान करावे,' असे देखील त्या म्हणाल्या.

यावेळी उपायुक्त अण्णा बोदडे यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, 'पिंपरी चिंचवड महापालिकेच्या २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीपेक्षा यंदा आपल्याला जास्तीत जास्त मतदान करून मतदानाच्या टक्केवारीत वाढ करायची आहे. त्यामुळे आपण सर्वांनी मतदान करून लोकशाही बळकट करण्यासाठी पुढे यावे.'

# शहरात 906 संवेदनशील मतदान केंद्र; एकूण 4 हजार 11 केंद्रावर होणार मतदान

## महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांची माहिती: 906 केंद्रांवर पोलिसांची विशेष नजर; 31 निवडणूक व्यवस्थापन कक्ष

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीची प्रशासनाची तयारी अंतीम टप्प्यात आली आहे. येत्या बुधवारी ( दि. १५) मतदान होणार असून त्यासाठी शहरात ४०११ मतदार केंद्र असणार आहेत. या केंद्रातील ९०६ मतदार केंद्र संवेदनशील म्हणून घोषित केली असून तेथे प्रशासन तसेच पोलिसांकडून विशेष खबरदारी घेतली जात असल्याची माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मतदानासाठी १४ हजार ५०० इव्हीएमचा वापर केला जाणार आहे. निवडणुकीतील गैरप्रकार रोखण्यासाठी १७२ पथके तयार करण्यात आली आहेत. आत्तापर्यंत ४ गुन्हे दाखल झाले असून, ६७ लाखाची रोकड जप्त केली असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओम प्रकाश दिवटे, निवडणूक विभागाचे उपायुक्त प्रसाद काटकर, उपायुक्त रवी पवार, निखिल मोरे यावेळी उपस्थित होते.

मतदानासाठी ८०० ते ९०० मतदारांचे एक मतदान केंद्र असणार आहे. शहरात ४ हजार ११ मतदान केंद्र निश्चित केले आहेत. मतदानासाठी २६ हजार कर्मचारी, ४ हजार १०० पोलिस कर्मचारी तैनात असणार आहेत. त्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. महापालिकेची निवडणूक व्यवस्थित पार पाडण्यासाठी ३१ निवडणूक व्यवस्थापन कक्ष स्थापन केले आहेत.

मतदानासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याची छपाई, पूर्ण केली आहे. ४ हजार ११ केंद्रांसाठी ६ हजार ५०० साहित्य किट तयार केले आहेत. आणखी १५०० मशिनची मागणी पालिकेने निवडणूक आयोगाकडे केली आहे. महिला मतदारांसाठी प्रत्येक प्रभाग दोन पिंक मतदान केंद्रे असणार आहेत.

महापालिका निवडणुकीच्या प्रक्रियेत २६ हजार कर्मचारी, ४ हजारपेक्षा जास्त पोलिस सहभागी आहेत. यापैकी १२ हजार शासकीय कर्मचारी टपाली मतदानाद्वारे त्यांचा हक्क बजावणार आहेत. त्यासाठी मतपत्रिकेची नोंदणी झाली आहे.या शिवाय, मतमोजणी १५ क्षेत्रीय कार्यालयांच्या ठिकाणी होणार असून त्या ठिकाणी प्रशासनाकडून ११०० कर्मचाऱ्यांची स्वतंत्रपणे नियुक्ती करण्यात आली असून सुमारे ३ हजार कर्मचारी निवडणुकीत सहभागी झाले आहेत.

महापालिका निवडणुकीची प्रशासनाची तयारी अंतीम टप्प्यात आली आहे. येत्या बुधवारी ( दि. १५) मतदान होणार असून त्यासाठी शहरात ४०११ मतदार केंद्र असणार आहेत. या केंद्रातील ९०६ मतदार केंद्र संवेदनशील म्हणून घोषित केली




### ३० हजार कर्मचारी नियुक्त

» महापालिका निवडणुकीच्या प्रक्रियेत २६ हजार कर्मचारी, ४ हजारपेक्षा जास्त पोलिस सहभागी आहेत. यापैकी १२ हजार शासकीय कर्मचारी टपाली मतदानाद्वारे त्यांचा हक्क बजावणार आहेत. त्यासाठी मतपत्रिकेची नोंदणी झाली आहे.या शिवाय, मतमोजणी १५ क्षेत्रीय कार्यालयांच्या ठिकाणी होणार असून त्या ठिकाणी प्रशासनाकडून ११०० कर्मचाऱ्यांची स्वतंत्रपणे नियुक्ती करण्यात आली असून सुमारे ३ हजार कर्मचारी निवडणुकीत सहभागी झाले आहेत.

### ४०११ मतदान केंद्र

» मतदानासाठी ८०० ते ९०० मतदारांचे एक मतदान केंद्र असणार आहे. शहरात ४ हजार ११ मतदान केंद्र निश्चित केले आहेत. मतदानासाठी २६ हजार कर्मचारी, ४ हजार १०० पोलिस कर्मचारी तैनात असणार आहेत. त्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. महापालिकेची निवडणूक व्यवस्थित पार पाडण्यासाठी ३१ निवडणूक व्यवस्थापन कक्ष स्थापन केले आहेत.

### दृष्टीक्षेपात मतदान

- संवेदनशील मतदान केंद्रे – ९०६
- प्रत्येक प्रभागात महिला मतदान केंद्र (पिंक बूथ) – २
- प्रत्येक प्रभागातील आदर्श मतदान केंद्र – २
- क्षेत्रीय अधिकारी संख्या – ४५४
- मतमोजणी केंद्रे – १५
- मतदानावेळी रुग्णवाहिका – ४५
- निवडणूक प्रक्रियेतील वाहने – ४३४
- मतदान केंद्रासाठी बस – ८६०

# नवीन वर्षात पुणेकरांना गॅस दर कपातीची भेट

## टोरंट कंपनीकडून पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात सीएनजी आणि पीएनजीचा पुरवठा केला जात असल्याने तिथे ही कपात लागू झाली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

टोरंट गॅस कंपनीने कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस (सीएनजी) आणि पाईप्ड नॅचरल गॅसच्या (पीएनजी) दरात कपात केली आहे. सीएनजीच्या दरात प्रतिकिलो एक रुपया आणि पीएनजीच्या (घरगुती गॅस) दरात प्रति घनमीटर एक रुपया कपात करण्यात आली आहे. टोरंट कंपनीकडून पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात सीएनजी आणि पीएनजीचा पुरवठा केला जात असल्याने तिथे ही कपात लागू झाली आहे.

टोरंट गॅस कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, पेट्रोलियम व नैसर्गिक वायू नियामक मंडळाच्या आदेशाच्या अंमलबजावणीमुळे सीएनजी आणि पीएनजीच्या दरातील ही कपात झाली आहे. मंडळाचा आदेश १ जानेवारीपासून लागू झाला आहे. कंपनीकडून पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात सीएनजी आणि पीएनजीचा पुरवठा केला जातो. त्यामुळे ग्रामीण भागात आता सीएनजी आणि पीएनजीचा दर कमी झाला आहे. या कपातीमुळे पेट्रोलच्या तुलनेत सीएनजी ४१.२६ टक्क्यांपर्यंत स्वस्त झाला आहे. टोरंट गॅसची पुणे जिल्ह्यात ७४ सीएनजी स्टेशन आहेत.

सीएनजी आणि पीएनजीच्या दरातील कपात ही स्वयंपाकासाठी इंधन म्हणून वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना आणि सीएनजी वाहनचालकांना दिलासा मिळणार आहे. यामुळे सामान्य माणसाचे घरगुती खर्च कमी होतील. या निर्णयामुळे नैसर्गिक वायूच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी पेट्रोलियम व नैसर्गिक वायू नियामक मंडळाच्या देशव्यापी मोहिमेला गती मिळणार आहे. याचबरोबर घरांमध्ये नवीन पीएनजी जोडणीस चालना मिळेल आणि प्रवासी व व्यावसायिक सीएनजी वाहनांच्या विक्रीला प्रोत्साहन मिळेल, असे टोरंट गॅस कंपनीने म्हटले आहे.




### ग्राहकांना आर्थिकदृष्ट्या फायदेशीर

» सीएनजी आणि पीएनजीतील कपात विभाग-१ दरांच्या अंमलबजावणीमुळे शक्य झाली आहे. यामुळे नागरी गॅस वितरण संस्थांसाठी गॅस वाहतूक खर्च कमी झाली आहे. या कपातीमुळे केंद्र सरकारच्या गॅसआधारित अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनाशी सुसंगत गॅसच्या वापराला प्रोत्साहन मिळणार आहे. टोरंट गॅसने नागरी गॅस वितरण संस्थांचे जाळे उभारण्यात मोठी गुंतवणूक केली आहे. यामुळे ग्राहकांना आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आणि पर्यावरणपूरक नैसर्गिक वायू इंधन म्हणून स्वीकारता येत आहे. टोरंट गॅसची देशभरात ५२६ सीएनजी स्टेशन असून, २ लाखांहून अधिक घरांना पीएनजी जोडणी देण्यात आली आहे.

# पैशांची उधळपट्टी ठरणार लोकशाहीला घातक

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीपूर्वी निवडणूक आयोगाने भूमिका घेणे आवश्यक

**पुणे | प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकांमध्ये पैशांच्या प्रभावाने निकाल फिरवले गेल्याचे भयानक चित्र समोर आले आहे. राजगुरुनगर, चाकण आणि आळंदी या तीनही नगरपरिषदांमध्ये प्रचाराची धुरा पैशानेच सांभाळली गेली, असा आरोप निकालांवरून होत आहे. आता येणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्येही असाच पैशांचा खेळ रंगणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. लोकशाहीसाठी हे चित्र अत्यंत घातक आहे, हे नक्की.

खेड तालुक्यातील झालेल्या आणि आगामी निवडणुकांमध्ये वर्षानुवर्षे लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी झटणारे, आंदोलने करून गुन्हे अंगावर घेणारे हाडाचे कार्यकर्ते हरवले आहेत. त्यांच्या जागी पैशांच्या जोरावर आणि भाईगिरीच्या खतावर विजयाचे पीक घेणारे उमेदवार समोर येत आहेत.

राज्यात एका माहितीनुसार, सन 2017-18 मध्ये एका तालुक्यातील निम्म्या मतदारांना रोख रकमेची ऑफर देण्यात आली होती. याचप्रमाणे, सन 2021 मध्ये ग्रामपंचायत जागांच्या लिलावाच्या तक्रारींमुळे निवडणूक आयोगाने दोन ग्रामपंचायतींच्या निवडणुका रद्द केल्या होत्या. सध्या सुरू असलेल्या महानगरपालिकेच्या निवडणूक प्रक्रियेतही 70 पेक्षा अधिक उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. हा वाद न्यायालयात पोहोचला आहे. अशा परिस्थितीत घोषणा झाली नसली तरी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती स्तरावरही असाच पैशांचा खेळ रंगण्याची शक्यता आहे, जिथे मोठ्या प्रमाणात निधी आणि सत्ता यांचा संबंध येत आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये पैशांच्या प्रभावाचे आणखी काही घातक मुद्दे समोर येत आहेत. मतखरेदीसाठी रोख रक्कम, दारू आणि इतर साहित्याचे वाटप सर्रास होत आहे. काही भागांत उमेदवार मतदारांना थेट 500 ते 2 हजार रुपये देत असल्याच्या बातम्या येत आहेत. ग्रामीण भागात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या जागा पैशांच्या जोरावर विकल्या जातात, ज्यामुळे योग्य उमेदवार बाजूला पडतात आणि पैसेवाले किंवा गुंड प्रवृत्तीचे लोक निवडून येतात. मतदार यादीत बनावट नावे समाविष्ट करून किंवा मतदान केंद्रांवर दबाव टाकून निकाल प्रभावित केले जातात.



### इच्छुकांकडून आताच कोट्यवधींचा खर्च

» इच्छुक उमेदवारांकडून आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जात असून, मतदारांना आकर्षित करण्यासाठी महागड्या भेटवस्तू, पैठणी साड्या, भव्य प्रदर्शने आणि खर्चीक देवदर्शन यात्रांचे आयोजन केले जात आहे. हे सर्व पाहता पैसेवाला उमेदवार आणि लाभार्थी मतदारांचा उदय होत असल्याचे दिसून येत आहे, जे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे.

### कठोर कारवाई करणे गरजेचे

» पैसा आणि सत्ता यांचा संगम ग्रामीण लोकशाहीला पोखरत आहे. खरे कार्यकर्ते हरवले असून, फक्त पैसेवाले उमेदवार आणि लाभ घेणारे मतदार उरले आहेत, असे मत व्यक्त होत आहे. निवडणूक आयोगाने आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच्या खर्चावर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. मोठे पक्ष उमेदवारांना कोट्यवधी रुपयांचा निधी पुरवतात, ज्याचा वापर मतखरेदीसाठी होतो, परंतु यावर निवडणूक आयोगाचे नियंत्रण अपुरे आहे. या सर्वांमुळे लोकशाहीचा उघडपणे खून होत असल्याची टीका जाणकार करत आहेत.

### लोकशाही पायासाठी धोकादायक

» अन्यथा ही प्रक्रिया केवळ श्रीमंतांसाठीची स्पर्धा ठरणार आहे. हे घातक वळण थांबवण्यासाठी मतदारांनी जागृत होणे आवश्यक आहे. पैशाच्या प्रलोभनाला बळी न पडता, खऱ्या विकासासाठी काम करणाऱ्या उमेदवारांना निवडणे हाच लोकशाही वाचवण्याचा मार्ग आहे; अन्यथा, महाराष्ट्रातील ग्रामीण निवडणुका पैशाच्या बाजारात रूपांतरित होतील, जे राष्ट्राच्या लोकशाही पायासाठी धोकादायक ठरणार आहे.

# समाजातील नकारात्मकता दूर करण्यासाठी धार्मिक कथांची गरज : दिलीप वळसे पाटील

## भीमाशंकरच्या विकासासाठी 227 कोटी मंजूर, तर एकलहरेत जैन धर्मीयांचे मोठे तीर्थक्षेत्र उभे राहणार

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसात समाजामध्ये नकारात्मकता येताना दिसत असून रामायण,महाभारत भागवत कथा यांच्या माध्यमातून ही नकारात्मकता दूर करता येते. जीवनाला एक नवी दिशा मिळवून देण्याचे काम धार्मिक ग्रंथ, कथा करत असतात.असे प्रतिपादन माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केले.

माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या गौरवप्रीत्यर्थ सोहळ्यानिमित्त मंचर मार्केटयार्ड येथे भव्य श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून हा धार्मिक सोहळा ज्ञानयज्ञासाठी गुरुवर्य श्रीकृष्ण कृपांकित डॉ.विकासानंद महाराज मिसाळ हे कथा व्यास म्हणून लाभले आहेत. मंचर बाजार समितीचे सभापती निलेश थोरात, संचालक मंडळ,बाजार समितीतील मार्केट यार्ड मित्र मंडळ,श्री गुरुदत्त प्रतिष्ठान,आडत व्यापारी असोसिएशन,

तरकारी आडत व्यापारी असोसिएशन,हमाल मापाडी संघटना संचालक, कर्मचारी वृंद कृषि उत्पन्न बाजार समिती श्री दत्तकृपा ना.सह.पतसंस्था मर्या., मंचर कमर्शियल कॉम्प्लेक्स, व्यापारी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने भागवत कथा संपन्न झाली. यावेळी झालेल्या कार्यक्रमात भाविकांना मार्गदर्शन करताना माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील बोलत होते.



### मंदिर परिसरात विविध विकास कामे

» पुणे म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील,शरद बँकेचे अध्यक्ष देवेंद्र शहा,गणेशनाथ महाराज,ह.भ.प.पांडुरंग महाराज येवले,किरणताई वळसे पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील म्हणाले, की बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेले श्रीक्षेत्र भीमाशंकर आपल्याजवळ असून मंदिर परिसरात विविध विकास कामे भाविकांच्या सुख सोयीसाठी शासनाच्या माध्यमातून २२७ कोटी रुपये मंजूर करण्यात आले.

तसेच उद्योजक देवेंद्र शहा यांच्या माध्यमातून एकलहरे येथे जैन धर्मियांचे मोठे तीर्थक्षेत्र उभे राहणार असून जवळपास २०० कोटी रुपये लोकवर्गणीतून गोळा करून हे तीर्थक्षेत्र उभे राहणार आहे. बाजार समितीचे सभापती निलेश स्वामी थोरात म्हणाले, माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील हे तालुक्याच्या भल्यासाठी ते काम करत असून त्यांनी त्यांचें आयुष्य हे तालुक्याच्या विकासासाठी खर्च केले आहे. त्यांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सोहळा आयोजित केला आहे.